सहाय्यक पोलीस अधीक्षकांची सात अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.
परिविक्षाधीन भारतीय पोलीस सेवा अधिकारी-६९ वी तुकडी

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : आयपीएस-०३१८/प्र.क्र.७०/पोल-१,
२ रा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ८ फेब्रुवारी, २०१८.

पहावे:- विशेष पोलीस महानिरिक्षक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र.प्रशि/प्रशि-२/६९ आर आर बॅच/९८३/२०१७/१२७, दिनांक ०६.०१.२०१८.

प्रस्तावना :-

भारतीय पोलीस सेवेच्या ६९ व्या तुकडीतील सात परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना ते महाराष्ट्र राज्यात परिविक्षाधीन म्हणून रुजू झाल्यापासून म्हणजेच दि.११.१२.२०१७ ते दि.२२.०६.२०१८ (६ महिने ११ दिवस) पर्यतच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यात प्रशिक्षण घेण्याकरीता 'सहाय्यक पोलीस अधीक्षक' दर्जाची सात अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर पदे भारतीय पोलीस सेवेतील कनिष्ठ वेतन श्रेणीतील म्हणजेच पे मॅट्रिक्सच्या स्तर १० या वेतन श्रेणीतील आहेत.

वर नमूद सात परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या दि.११.१२.२०१७ ते दि.२२.०६.२०१८ (६ महिने ११ दिवस) या कालावधीतील वेतन व भत्ते यासाठी रुपये ३४,०२,०००/- (रुपये चौत्तीस लाख दोन हजार फक्त) इतका खर्च मंजूर अनुदानातून भागविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासन आता, खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

भारतीय पोलीस सेवेच्या ६९ व्या तुकडीतील खालील तक्त्यात नमूद केलेल्या ७ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना दि.११.१२.२०१७ ते दि.२२.०६.२०१८ (६ महिने ११ दिवस) या पर्यंत महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक आणि त्यानंतर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात प्रशिक्षण कालावधीकरीता वेतन व भत्ते यासाठी रुपये ३४,०२,०००/- (रुपये चौत्तीस लाख दोन हजार फक्त) इतका खर्च करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रशिक्षणार्थींचे नांव	प्रशिक्षणासाठी नियुक्तीचा जिल्हा
१	श्री. समीर अस्लम शेख	अमरावती (ग्रामीण)
२	श्री. संदीप सिंग गिल	नांदेड
३	श्री. सौरभ कुमार अग्रवाल	पुणे (ग्रामीण)
४	श्री. निलाभ रोहन	अहमदनगर
५	श्री. सोमय विनायक मुंढे	औरंगाबाद (ग्रामीण)
६	मुम्मका सुदर्शन	नाशिक (ग्रामीण)
७.	श्री. पवन मारोती बनसोडे	सातारा

२. उपरोक्त ७ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी होणारा खर्च "२०५५-पोलीस-१०९ (०१) जिल्हा पोलीस बल " या उपलेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून वेतन व भत्ते या उद्दीष्टामधून सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षीच्या मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय, क्र. पदनि २०१२/ प्र.क्र.६६/ १२/ वित्तीय सुधारणा, दिनांक ११ जुलै, २०१२ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०५१९०१५१९६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tushar
Vasant
Mahajan

Digitally signed by Tushar Vasant Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=Tushar Vasant Mahajan
Date: 2018.02.08 16:53:22 +05'30'

(तुषार महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
- महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

- विशेष पोलीस महानिरिक्षक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
- निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
- जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड व अमरावती
- सह संचालक (तांत्रिक), लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई (२ प्रती).
- वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.
- सहाय्यक संचालक, भापोसे कक्ष, गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई.
- अवर सचिव, कार्यासन बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
- वैयक्तिक नस्ती / निवड नस्ती (पोल-१).